महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Emailid:mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०-२५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ५५४२
दिनांक : ०९/११/२०२०

# आदेश

विषय:- **कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).**
**दिवाळी सणाच्या औचित्याने लोकहितास्तव व सार्वजनिक हित लक्षात घेऊन निर्गमित करण्यात येत असलेले आदेश.**

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०,३ नोव्हेंबर२०२०
५) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई यांचे आदेश आरएलपी-११२०/प्र.क्र.१८०/विशा १ ब दिनांक ५ नोव्हेंबर २०२०

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) संदर्भात कोविड - १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम -२०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रात सजगतेने व सतर्क राहून दिवाळी साजरी करणे बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर साजऱ्या होणाऱ्या यंदाच्या दिवाळीत नागरिकांनी कोविड विषयक प्रतिबंधात्मक खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाद्वारे सातत्याने व अहोरात्र पद्धतीने करण्यात आलेल्या सर्वस्तरीय प्रयत्नांमुळे आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे सध्या कोविड नियंत्रणात येत असल्याचे उपलब्ध आकडेवारी वरून दिसत असले तरीही कोविडची संसर्गजन्यता अधिक असल्यामुळे आपण सर्वांनीच अधिकाधिक काळजी काटेकोरपणे घेणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन सोशल डिस्टन्सींग, सार्वजनिक ठिकाणी वावरताना मास्कचा वापर आणि वारंवार साबणाने सुयोग्य प्रकारे हात धुणे याबाबींचा अवलंब करावयाचा आहे तसेच फटाक्यांच्या धुराचा कोविड - १९ बाधित रुग्णांना त्रास होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन महानगरपालिका क्षेत्रात फटाक्यांचा कमीत कमी वापर करावा / शक्यतो टाळावा.

वरील अनुषंगाने व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आणि नागरिकांना अधिक सजग राहून दिवाळीचा आनंद घेता यावा, यासाठी जारी करण्यात येत असलेले आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रामधील महानगरपालिकेच्या मालकीचे ठिकाणे (उद्याने, मैदाने , पर्यटन स्थळे, शाळा ) इत्यादी ठिकाणी कोणत्याही प्रकारचे फटाके फोडता येणार नाहीत. तसेच सर्व खाजगी परिसरात फटाक्यांचा कमीत कमी वापर करावा / शक्यतो टाळावे.

२) कोविड - १९ बाधित रुग्णांना त्रास होऊ नये यासाठी कमी आवाजाचे (ध्वनी प्रदूषण न होणारे) तसेच कमी धूर होणाऱ्या फटाक्यांचा वापर करावा. नागरिकांनी कोविड विषयक योग्य ती खबरदारी घ्यायची आहे. यामध्ये मास्कचा वापर, सोशल डिस्टन्सींग, साबणाने हात स्वच्छ धुणे इत्यादी बाबींची काळजी घ्यावी.

३) दिपावली हा प्रकाशाचा उत्सव मानला जातो. या उत्सवा दरम्यान दरवर्षी मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात येते. त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढून जनसामान्यांच्या तसेच प्राणीमात्रांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम दिपवाली उत्सवा नंतर बराच कालावधीपर्यंत दिसून येतात. कोरोना आजारामुळे परीणाम झालेल्या अनेकांना फटाक्यांच्या धुरामुळे वायू प्रदूषणाचा थेट परिणाम होऊन त्रास होण्याची भीती आहे. ही बाब विचारात घेऊन नागरिकांनी फटाके फोडण्याचे निर्णय घ्यावे.

४) दिवाळीच्या काळात सोशल डिस्टन्सींग व सॅनिटेशन बाबत मार्गदर्शक सूचना / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) कोविडच्या अनुषंगाने हात स्वच्छ करण्यासाठी वापरण्यात येणारे सॅनिटायजर ज्वलनशील असल्याने दिवाळीचे दिवे लावताना तसेच फटाके फोडताना सॅनिटायजरचा वापर टाळावा.

६) दिवाळीच्या काळात हात स्वच्छ करताना सॅनिटायजर ऐवजी साबण / हॅन्ड वॉशचा सुयोग्य प्रकारे व नियमितपणे वापर करण्यास प्राधान्य द्यावे.

७) दिवाळी नियंत्रित स्वरुपात साजरी करायची असल्याने या काळात कोणत्याही प्रकारचे सामुदायिक / सांस्कृतिक / सार्वजनिक अशा सामाजिक एकत्रीकरण (दिवाळी पहाट) कार्यक्रमांना परवानगी नसेल. आयोजित करावयाचे झाल्यास online पद्धतीने आयोजन करावे.

८) दिवाळीकरिता खरेदी करण्यासाठी बाहेर जाणे गरजेचे असल्यास शक्यतो कमी गर्दीच्या वेळी व कमी गर्दीच्या ठिकाणी जाण्यास प्राधान्य द्यावे व योग्यती खबरदारी घ्यावी.

९) कोविड विषयक घ्यावयाची महत्वाची खबरदारी, संबंधित नियम याबाबत देखील सहाय्यक महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने जनजागृती करावयाची आहे. तसेच याअनुषंगाने नियम भंग करणाऱ्यांवर, मास्क सुयोग्य प्रकारे परिधान न करणे, रस्त्यावर थुंकणे, विना परवानगी कार्यक्रम आयोजित करणे, गर्दी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई सहाय्यक महापालिका आयुक्त व पोलीस प्रशासन यांनी नियमितपणे करावयाची आहे.

१०) यापूर्वी वेळोवेळी परवानगी देण्यात आलेले सर्व उपक्रम त्याकरिताः निर्गमित केलेले आदेश व मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील आदेशापर्यंत सुरु राहतील.

११) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

१२) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०९.११.२०२० पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ०९ .११.२०२० रोजी दिलेला आहे.

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहींसाठी अग्रेषित